# सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष :** पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

विधानसभेचे बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ पासून नागपूर येथे सुरु झालेले पावसाळी अधिवेशन आज शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१८ रोजी संस्थगित होत आहे.

या सत्र काळातील बैठकांची एकूण संख्या १३ असून प्रत्यक्षात कामकाज ८६ तास १९ मिनिटे झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे १० मिनिटे व अन्य कारणामुळे ०८ तास ०९ मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी ८ तास १९ मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ६ तास ३९ मिनिटे झालेले आहे.

प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची एकूण संख्या ९६६९ असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची एकूण संख्या ८१३ आहे. सभागृहात एकूण ३७ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. तसेच प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या ०९ असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नाची संख्या ०१ आहे.

प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची एकूण संख्या २७६० असून स्वीकृत लक्षवेधी सूचनांची संख्या ११४ आहे. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या ४२ आहे.

स्थगन प्रस्तावाच्या एकूण ११३ सूचना प्राप्त झाल्या असून सर्व सूचना अमान्य झाल्यामुळे एकाही स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

अल्पकालीन चर्चेची (मविस नियम १०१ अन्वये) प्राप्त झालेली ०१ सूचना मान्य झाली असून त्यावर चर्चा झाली नाही.

...२...

Scanned with CamScanner

**मा.अध्यक्ष...**

या अधिवेशनात विधानसभेने एकूण २३ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण १५ विधेयके संमत केली.

अर्धा-तास चर्चेच्या एकूण २४६ सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी १०८ स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात एकाही अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

अशासकीय ठरावांच्या एकूण ४०८ सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी २५४ सूचना मान्य झाल्या परंतु सभागृहात एकाही अशासकीय ठरावाच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

शासकीय ठरावाची एकही सूचना प्राप्त झालेली नाही.

नियम २९३ अन्वये प्राप्त झालेल्या ०४ सूचना मान्य झाल्या त्यापैकी ०३ सुचनेवर चर्चा झाली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ७६.४२ टक्के होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती ८६.४३ टक्के तर कमीत कमी उपस्थिती १३.५७ टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

----------

Scanned with CamScanner